# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ८१-२३** **दिनांक :- १०/०३/२०२३**

## चोरी करणा-या आरोपीतास अटक करुन ०४,५८,५६०/- रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत - तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

तुळींज पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २८/०२/२०२३ रोजी दुपारी १३.३० ते १५.३० वा.चे दरम्यान फिर्यादी नामे सौ. सुनिती विस्पी रिडर, वय ५१ रा. घर क्र. ४७१, मोरेगाव, खंडीचा पाडा, पिलाजी पाटील अपार्टमेंटच्या वर, विरार रोड, नालसोपारा पुर्व ता. वसई जि.पालघर यांचे राहते घरातील बेडरुमचे कपाटातील अंदाजे ०४,७७,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे, डायमंडचे दागदागिने व ओप्पो कंपनीचा ए १७ मोबाईल फोन अज्ञात चोरट्याने चोरी केलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन तुळींज पोलीस ठाणेत गुन्हा. रजि.नं. १७५/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३८० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचे अनुषंगाने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळाची पाहणी करुन फिर्यादी यांचे राहते घरी काम करणारा मुलगा नामे उत्तम ज्ञानेश्वर खंदारे यास चौकशीकामी ताब्यात घेवुन त्याचेकडे दाखल गुन्ह्याचे अनुषंगाने विचारपुस केली असता तो असमाधानकारक तसेच दिशाभुल करणारी उत्तरे देत होता. तसेच पोलीसांच्या चौकशीचा ससेमिरा टाळण्याकरीता उत्तम ज्ञानेश्वर खंदारे याने फिनेल पिवुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करुन तपास प्रक्रियेत अडथळा आणण्याचा प्रयत्न केला होता. तांत्रिक विश्लेषणाव्दारे उत्तम ज्ञानेश्वर खंदारे हा गुन्हा घडलेल्या दिवसी विधीसंघर्ष बालक याच्या वारंवार संपर्कात असल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीत नामे उत्तम ज्ञानेश्वर खंदारे व विधीसंघर्ष बालक यांच्याकडे तपास केला असता त्यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादी यांचे घरातील सोन्याचे दागिने चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीत यांचेकडुन नमुद गुन्हयात चोरी केलेले एकुण १५१.५२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तसेच १० ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने असा एकुण ४,५८,५६०/- रुपाये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीत नामे उत्तम ज्ञानेश्वर खंदारे यास दिनांक ०९.०३.२०२३ रोजी अटक करुन विधीसंघर्ष बालकास मा. बाल न्याय मंडळ, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे येथे हजर करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ विरार तथा अति. कार्यभार परिमंडळ ३ विरार, श्री. चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर, गुन्हे प्रकटीकरण

पथकाचे स.पो.नि. मिथुन म्हात्रे, पो.उप.निरी. बाळासाहेब बांदल, स.फौ. शिवांनद सुतनासे, पो.हवा. आनंद मोरे, उमेश वरठा, पांडुरंग केंद्रे, अशपाक जमादार, पो. अंम. छपरीबन, विनायक राऊत यांनी केली आहे.

